
४१वे मराठवाडा साहित्य संमेलन, औरंगाबाद

आयोजक: लोकसंवाद फाउंडेशन, औरंगाबाद

# गोंदण



४१वे मराठवाडा साहित्य संमेलन, औरंगाबाद २०२१

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका

संपादकीय
स्वागताध्यक्षांचे मनोगत

## स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि आजचा मराठवाडा

१) मराठवाडा मुक्तीच्या सात दशकांचे सिंहावलोकन - डॉ. व्यंकटेश काब्दे ०१
२) आरोग्यसेवेची दशा आणि कोरोनानंतरची दिशा - डॉ. श्रीरंग देशपांडे ०५
३) सहकार नव्या शतकाची चळवळ बनेल काय? - श्रीकांत देशमुख १०
४) उद्योगाचे गाडे : कसे चालते, कुठे रुतते? - सुनील किर्दक १५
५) शिल्पवैभवाची समृद्धी ! - साईली पलांडे-दातार १८

## मराठवाड्यातील सामाजिक चळवळी आणि मराठी साहित्य

६) विद्रोहाच्या तत्वज्ञानाची संतवाङ्मयातील रंगरूपे - डॉ. सतीश बडवे २४
७) मराठवाड्यातील सत्यशोधक चळवळ - प्रा. जी. ए. उगले २९
८) मराठवाड्यातील सत्यशोधकी साहित्य - डॉ. हंसराज भोसले ३४
९) हैदराबाद मुक्तिसंग्राम आणि मराठी साहित्य - डॉ. विश्वाधार देशमुख ३७
१०) विकलांग मनुष्यत्वाचे सृजन - डॉ. ऋषिकेश कांबळे ४२
११) शेतकरी आंदोलन आणि मराठी साहित्य - डॉ. केशव सखाराम देशमुख ४६

## रास - आरास


१२) बी. रघुनाथ : निजामकालीन मराठवाड्याचे भाष्यकार - डॉ. रामचंद्र काळुंखे ५२
१३) 'पाचोळा'ची पन्नाशी - डॉ. भीमराव वाघचौरे ५७
१४) भारतीय पातळीवरील नाटककार : प्रा. दत्ता भगत - प्रा. प्रल्हाद जी. लुलेकर ६२
१५) भास्कर चंदनशिव यांच्या कथेतील विद्रोह - डॉ. मधु सुरेश सावंत ६७
१६) बाबू बिरादार : मानवी स्वभावधर्माची उकल करणारे लेखक - ऋषिकेश देशमुख ७१
१७) अनुराधाबाईंची कविता : मराठी माणसाच्या पुरातन जीवाश्माचा दस्तावेज ! - सुचिता खल्लाळ ७४

Scanned with CamScanner

# मराठवाड्यातील सत्यशोधकी साहित्य

डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील सत्यशोधक चळवळ ही एक गतिशील परिवर्तनवादी सामाजिक, साहित्यिक चळवळ होती. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करण्याच्या अगोदरच 'निर्मिकाचा शोध' या पद्यपुस्तिकेपासून १८५३ मध्ये सत्यशोधकी साहित्याची निर्मिती सुरु झाली होती. मात्र सत्यशोधक समाजाच्या स्थापने नंतर महात्मा फुले यांनी आपल्या सामाजिक कार्याला संघटनात्मक स्वरुप प्राप्त करून दिले. अशा ऐतिहासिक सत्यशोधकी साहित्य प्रवाहाचे लेखन करणाऱ्या मराठवाड्यातील प्राचार्य गजमल माळी, डॉ. श्रीराम गुंदेकर, प्रा. रामप्रसाद तौर, प्रा. जी. ए. उगले, डॉ. रावसाहेब ढवळे या लेखकांच्या साहित्याचा विचार या ठिकाणी करावयाचा आहे.




**प्राचार्य गजमल माळी.**

साठोत्तरी मराठी साहित्यात एक महत्वपूर्ण सृजनशील कवी, बहुआयामी लेखक आणि परखड संशोधक- विचारवंत म्हणून गजमल माळी यांची नोंद घ्यावी लागते. त्यांनी ललित लेखनाबरोबरच जाणीवपूर्वक वैचारिक साहित्यही निर्माण केले. गजमल नारायणराव माळी यांचा जन्म इ.स. १९३४ मध्ये औरंगाबाद येथे झाला. माळी हे सत्यशोधक समाजाचे खंदे कार्यकर्ते होते.

'नागफणा आणि सूर्य' (१९७९) हे खंडकाव्य त्यांनी लिहिले. अजिंठा लेणीच्या परिसरात दीडशे वर्षांपूर्वी फुललेली रॉबर्ट गिल आणि पारो यांची प्रेमकहाणीही 'कल्पद्रुमाची डहाळी' (१९९७) या नाटकातून लिहिली. त्यावर बेतलेल्या 'पारु' चित्रपटाचीही राज्यभरात बरीच चर्चा झाली. 'राष्ट्रीय काँग्रेस आणि सत्यशोधक समाज' हा त्यांचा वैचारिक ग्रंथ काँग्रेस आणि सत्यशोधक समाज यांच्या संबंधांवर प्रकाश टाकतो. 'वैदिक धर्म परंपरा आणि महात्मा ज्योतिराव फुले' या त्यांच्या ग्रंथाला 'मधुराबाई पिंगळे पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले होते. याशिवाय, 'तुकारामाचे निवडक शंभर अभंग', 'महात्मा फुले यांचे निवडक विचार' या ग्रंथांचे संपादनही त्यांनी केले. मराठी साहित्य महामंडळ, मराठवाडा साहित्य परिषद आणि मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. 'राजकीय सत्तांतर' या सामाजिक-राजकीय विषयाला वाहिलेल्या साप्ताहिकाचे ते



Scanned with CamScanner

संस्थापक-संपादक होते. परिवर्तनवादी चळवळीत ते अग्रणी होते. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या चळवळीत निर्भिडपणे आपली मते मांडली.

**डॉ. श्रीराम गुंदेकर**

डॉ. श्रीराम गुंदेकर यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९५५ मध्ये बीड जिल्ह्यातील आंबेसावळी या खेडेगावात सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. बीड येथील नवगण महाविद्यालयातून पीयूसीचे शिक्षण पूर्ण करून बी. ए. प्रथम वर्षाला बलभीममध्ये प्रवेश घेतला. पदवीला असताना गुरु म्हणून डॉ. नागनाथ कोतापल्ले सरांचा सहवास लाभल्यामुळे पुरोगामी विचाराचे संस्कार होऊन त्यांचे व्यक्तिमत्व अधिक झळाळून निघाले. याच काळात म्हणजे १९७२-७६ च्या दरम्यान महाराष्ट्रातील विद्यार्थी संघटनांच्या संपर्कात आल्यामुळे सामाजिक प्रश्नाकडे पाहण्याची नवी समज आणि जाणीव प्राप्त झाली. १९७८ मध्ये औरंगाबाद विद्यापीठातून एम. ए. मराठी मध्ये पदव्युत्तर होऊन लातूरच्या नामांकित शिक्षण संस्थेत नोकरीला लागले. लातूर हीच त्यांची तपोभूमी आणि कर्मभूमी झाली.

**डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी पीएच.डी.चे संशोधन करण्यासाठी त्यांनी "महात्मा जोतिबा फुले :**

विचार आणि वाङ्मय" हा विषय निवडून सत्यशोधकी साहित्याचा अभ्यास हीच ध्येयनिश्चिती केली होती. 'महात्मा जोतिराव फुले : साहित्य आणि साहित्यमूल्ये', 'सत्यशोधकी साहित्य परंपरा आणि स्वरुप', ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन', महाराष्ट्राचे शिल्पकार : सम्यक क्रांतीचे प्रणेते सत्यशोधक महात्मा फुले', हे त्यांचे समीक्षा ग्रंथ याची साक्ष देतात. त्यांच्या ग्रामीण कथासुद्धा (लगाम आणि उचल) महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या आहेत. त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत संशोधन प्रकल्पासाठी "सत्यशोधकी साहित्याचा इतिहास" अशा चार बृहद्खंडात्मक ग्रंथाचे संशोधन पूर्ण केले. चारपैकी सत्यशोधकी साहित्याच्या इतिहासाचे दोन खंड प्रकाशित झाले आहेत.

**प्रा. जी. ए. उगले**

सत्यशोधकाचा चरित्रकोश लिहून मराठी सत्यशोधकी साहित्य प्रवाहामध्ये ज्यांनी मौलिक कामगिरी केली, ते गणपतराव अंबादासराव उगले यांचा जन्म पैठण तालुक्यातील नायगाव या खेडेगावात सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. अंबड जालना या ठिकाणी १९८५- २०१२ पर्यंत अध्यापनाचे कार्य केले. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारसरणीचा पुरस्कार करून महामानवाच्या परिवर्तनवादी विचाराचा प्रचार आणि प्रसार महाराष्ट्रभर व्याख्यानाच्या माध्यमातून केला.

एकीकडे शिक्षक म्हणून आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत असताना, दुसरीकडे सत्यशोधक समाजाच्या जालना शाखेचे कार्याध्यक्ष म्हणून कार्य केले. पुढे ते सत्यशोधकी साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष झाले. इतकेच नाही, तर अ. भा. स. समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून १३ जुलै २०१३ ते १० जुलै २०१५ या कालावधीमध्ये त्यांनी कार्य केले.

विविध पदे आणि जबाबदारी सांभाळून उगले यांनी विपुल असे साहित्य लेखन केले. काही ग्रंथाचे संपादनही केले आहे. त्यांच्या पुढील काही ग्रंथाची नावे पाहिली तर सहज लक्षात येईल. महात्मा



Scanned with CamScanner

फुले एक मुक्त चिंतन (२०००), ज्ञानोदय आणि महात्मा फुले (२००४), सत्यशोधक समाज अधिवेशने : चिंतन आणि चिंता (२००६), विद्यादेवी सावित्रीबाई रोडे (२००६), सावित्रीबाई फुले (२००७), सत्यशोधक तुकाराम हनुमंत पिंजन (२००८), सत्यशोधक मित्र: हाजी काजी वकील, पैठण (२००९), दिल बंधू आणि तानुबाई बिर्जे (२००९), संशोधकांचे ओत्तुर (२०१०), सत्यशोधकांचे अंतरंग (२०१७), सत्यशोधक चळवळीचा समग्र इतिहास व सत्यशोधकांचा चरित्रकोश (आगामी).

**डॉ. रावसाहेब ढवळे**

रावसाहेब भुजंगराव ढवळे यांचा जन्म तोंडोळी (ता. जाफ्राबाद, जि. जालना) येथे झाला. सुरुवातीच्या काळात औरंगाबादेत पत्रकारिता करणारे ढवळे नंतर जालना येथून प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले. डॉ. ढवळे यांची नुकतीच सत्यशोधक समाजाच्या विभागीय अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. याआधीही डॉ. ढवळे यांनी अ. भा. सत्यशोधक समाजाचे राष्ट्रीय सहसचिव म्हूणन कार्य केले आहे. त्याबरोबरच सत्यशोधक समाज, जिल्हा जालनाचे १२ वर्ष अध्यक्ष म्हणूनही कार्य केले. परतूर येथे झालेल्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षही राहिले. अनेक संस्थात्मक जबाबदाऱ्या डॉ. ढवळे यांनी उत्तमपणे पार पाडल्या आहेत.

डॉ. ढवळे यांनी पीएच.डी. संशोधनासाठी प्राचार्य गजमल माळी यांच्या समग्र वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास केला. "सत्यशोधक : वसा आणि वारसा" या नावाने सुंदर देखणे पुस्तक ही प्रकाशित केले. हा ग्रंथ म्हणजे प्राचार्य गजमल माळी यांच्या वैचारिक लेखानाचा चिकित्सक आणि वस्तुनिष्ठपणे मांडलेला जीवनप्रावास आहे. 'प्राक्तनाची कोरीव लेणी' (माळी यांच्या कवितेचे आकलन आणि आस्वाद), रॉबर्ट गिल - पारो : अजिंठ्याच्या डोंगरदऱ्यात विखुरलेली शोकात्म प्रेमकहाणी, 'कामायनी'तील प्रणयरंग, 'वार्तापत्र लेखन कौशल्य' ही पुस्तके त्यांनी लिहिली आहेत.

प्राचार्य गजमल माळी, डॉ. श्रीराम गुंदेकर, प्रा. जी. ए. उगले आणि डॉ. ढवळे या मराठवाड्यातील सत्यशोधकामध्ये प्रा. रामप्रसाद तौर हे नाव देखील अतिशय महत्वपूर्ण आहे. प्रा रामप्रसाद तौर हे प्रचंड ताकदीचे सत्यशोधक आहेत. त्यांच्या वैचारिक निष्ठा आणि बैठकदेखील पक्की आहे. अनेक सत्यशोधकी सभा, संमेलनामधून त्यांनी विचार व्यक्त केले असले, तरी म्हणावी अशी स्वतंत्र ग्रंथसंपदा मात्र त्यांच्या नावावर नाही. प्रासंगिक निमित्ताने त्यांनी जे लेखन केले आहे त्यावरून त्यांच्या अभ्यासाचा आवाका लक्षात येतो. उदा. डॉ. गुंदेकरांच्या सत्यशोधकी साहित्याच्या इतिहासावर तौरांनी जो समीक्षात्मक लेख लिहिला आहे तो उच्च दर्जाचा आहे. या पाचही सत्यशोधक लेखकांच्या साहित्याचा मराठवाड्यात आजच्या काळात सत्यशोधकी साहित्याचा प्रवाह, प्रवाहित आणि गतिमान करण्यामध्ये अत्यंत मोलाचा वाटा आहे, हे कुणालाही नाकारता येत नाही.

**(लेखक सत्यशोधक चळवळीचे आणि साहित्याचे अभ्यासक आहेत.)**

*****



Scanned with CamScanner